**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

१८. रामचंद्र मारूती दानवले यांचे वय अंदाजे ७० वर्षे आहे. मारूती गार्डे व त्यांच्या वयात किती अंतर होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यांच्यात सर्वसाधारणपणे २० वर्षाचे अंतर असावे. ती दोघेही कधीही एकत्र शाळेला अथवा कॉलेजला शिकत नव्हती तसेच ती दोघे कधीही एकत्र नोकरीला सुध्दा नव्हते. ती दोघेही शेजारी सुध्दा राहायला नव्हती. ती दोघेही वेगवेगळया समाजाची आहेत. त्या दोघांचा संबंध कधी आला या बाबत मला माहिती आहे. त्या बाबत माझया साक्ष शपथपत्रात नमुद नाही. त्या बाबत साक्ष शपथपत्रात नमुद करायला मला कोणतीही अडचण नव्हती.

१९. रामचंद्र मारूती दानवले हा मारूती गार्डे यांनी केलेल्या कोणत्याही दस्ताच्यावेळी हजर नव्हता. साक्षीदार सांगतो की तो मारूती गार्डे यांच्या मृत्युपत्राला साक्षीदार होता. मारूती गार्डे व रामचंद्र दानवले यांची तोंड ओळख होती. रामचंद्र दानवले आमच्या शेतात गडी म्हणुन कामाला येत होते. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे त्यांचे माझया वडीलांशी स्नेहाचे संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की सहसा रामचंद्र माझया वडीलांचा शब्द खाली पडुन देत नव्हते व ते त्यांचे ऐकायचे. कथीत मृत्यूपत्राचा दस्त करतेवेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे रामचंद्र दानवले हे ते मृत्यूपत्र करतेवेळी हजर होते किंवा कसे हे मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते.

२०. रामचंद्र दानवले यांनी त्यांच्या साक्ष शपथपत्रात ते गट क्रमांक १३६९ ही मिळकत वहिवाटुन देत होते हा नमुद केलेला मजकुर माझया म्हणण्याप्रमाणे बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे मारूती रामा गार्डे हे स्वत: ती मिळकत वहिवाटत नव्हते कारण ते वयोवृध्द होते व ते आजारी होते. माझया म्हणण्यानुसार ती मिळकत मी व माझे वडील व भाउ वहिवाटत होते. सदरील मिळकत मारूती रामा गार्डे यांच्या हयातीपासुनच

म्हणजेच सन १९९५-१९९६ पासुन त्यांच्या वयामुळे व आजारामुळे आम्ही वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे नाही की रामचंद्र दानवले व मारूती गार्डे यांच्यातील संबंध कसे होते या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की मारूती गार्डे मुंबईत असताना त्यांच्याकडे रामचंद्र दानवले यांचे येणे जाणे नव्हते. सन १९६७ साली मारूती गार्डे हे मुंबईहुन बावधन येथे आले. साक्षीदार पुन्हाहुन सांगतो की ते सन १९८७ साली मुंबईहुन बावधनला आले. हे म्हणणे खरे आहे की त्या दोघांमध्ये कोणतेही आर्थीक देणेघेणे नव्हते.

२१. मी प्रस्तुत प्रकरणातील मृत्यूपत्राचा दस्त पाहिलेला आहे. तो दस्त किती रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर केला हे मला माहिती नाही. त्यावर चार साक्षीदार आहेत. चार साक्षीदारांच्या सहया असलेलाच मृत्यूपत्राचा दस्त या प्रकरणात दाखल केलेला आहे. त्या चार साक्षीदारांची नावे रामदास मानसिंग शिंदे, रामचंद्र मारूती दानवले, गिताबाई तुकाराम शेवते व कृष्णात रामचंद्र गार्डे अशी आहेत. गिताबाई शेवते व कृष्णात गार्डे यांनी सदरील मृत्यूपत्राच्या दस्तावर साक्षीदार म्हणुन निशाणी अंगठा दिलेला आहे. कृष्णात गार्डे यांनी त्या दस्तावर सही सुध्दा केली आहे. आता मला नि.क्र.५७ वरील मृत्यूपत्राच्या दस्तातील पान क्र.५ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की त्यावर साक्षीदारांची नावे व सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या दस्तावर कृष्णात गार्डे व गिताबाई शेवते यांच्या सहया व नावे साक्षीदार म्हणुन नाहीत. माझया म्हणण्यानुसार माझयाकडे असलेल्या मृत्यूपत्राच्या दस्तावर कृष्णात गार्डे व गिताबाई शेवते त्यांच्या साक्षीदार म्हणुन सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.५७ वरील दस्त मी दाखल केलेला नाही.

***प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरी/-

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०६/११/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, वाई.